क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ९६ दिनांक ०८ / ०२ / २००७

विषय : सा.आ.१६२ (क) दि.१५.३.२००५ अनुसार नियुक्त झालेल्या वीज सेवकास कंपनीचे काम करीत असताना अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चासाठी अग्रीम व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करणेबाबत.

.....

सा.आ.१६२ (क) दि.१५.३.२००५ अनुसार नियुक्त झालेल्या वीज सेवकास कंपनीचे काम करीत असताना अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चासाठी अग्रीम व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देणेबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. महावितरण कंपनीच्या नियमानुसार संबंधित पदासाठी विहित केलेली तारमार्गावरील सर्व कामे वीज सेवकास पार पाडावी लागत असल्याने कंपनीचे काम करीत असताना त्याला अपघात झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी कराव्या लागणा-या खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी तरतूद करण्यास एक विशेष बाब म्हणून व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन मंजुरी दिली आहे.

३. यानुसार सा.आ.क्र. १६२ (क) दि.१५.३.२००५ अंतर्गत नियुक्त झालेल्या वीज सेवकास कंपनीचे काम करीत असताना अपघात झाल्यास सदर वीज सेवक, उपचारासाठी होणा-या वैद्यकीय खर्चासाठी प्रतिपूर्ती मिळण्यास प्रशासकीय परिपत्रक क्र.८९ दि.२३.१२.२००६ आणि त्यासंबंधीचे शुध्दीपत्र क्र.१३९५ दि.१५.१.२००७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार पात्र राहील.

४. प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.५.२००६ मध्ये नमूद केलेले सक्षम अधिकारी वीज सेवकाच्या बाबतीतही वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करण्यास सक्षम अधिकारी असतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक त्वरित अंमलात येईल तसेच या विषयासंबंधीच्या प्रलंबित प्रकरणांसाठी देखील लागू होईल.

(सु. य. पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

१) क्षेत्रीय कार्यालयातील सं.व सु.परिमंडले/मंडले/विभागीय कार्यालये
२) निगम कार्यालयातील विभाग प्रमुख/कक्ष प्रमुख

*K/Adm.Cir.F.N.5 -24*